**परिपत्रक 278 दिनांक 24 एप्रिल 1992**

**विषय :- तातडीच्या व निकडीच्या प्रकरणी (इंग्रजीत/मराठीत) मुद्रणाचे काम स्थानिक खाजगी मुद्रणालयाकडून करुन घेणेविषयी ...**

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे कीं, विषयांत नमूद केल्याप्रमाणे प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख ज्या ज्या वेळी अशा प्रकारे तातडीच्या व निकडीच्या प्रकरणी मुद्रणाचे काम स्थानिक खाजगी मुद्रणालयामार्फत करुन घेतात, त्या त्या वेळी महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियमाखाली प्रदान केलेल्या/करण्यांत आलेल्या वित्तीय अधिकाराचे काटेकोरपणे पालन न करता आकस्मिक निधीतून मर्यादेपेक्षा जास्त खर्च करतात, परिणामी त्यामुळे अशा प्रसंगी/प्रकरणी कार्योत्तर मंजूरीसाठी प्रकरण शासनाकडे पाठवावे लागते व त्यामुळे त्या संदर्भात पुढील अडचणी व टिका-टिपण्णीस तोंड दयावे लागते. तेव्हा यापुढे सर्व प्रादेशिक पमुख **(रिजनल हेडस्) व कार्यालय प्रमुख (हेड ऑफ ऑफिस) यांनी उपरोल्लेखीत महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, 1965 मधील नियमाखाली प्रदान करण्यांत आलेले वित्तीय अधिकार व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 च्या भाग एक व दोन मधील आदेशांचे पालन काटेकोरपणे करावे. तसे न झाल्यास व अशी प्रकरणे यापुढे उद्धवल्यास त्याबाबत संबंधीत प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.**

( क. **मो. देसाई** )
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

**दिनांक 24 एप्रिल 1992.**

प्रति,

1. धर्मादाय सह आयुक्त, पुणे/नागपूर/औरंगाबाद
2. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई/कोल्हापूर/पुणे-सोलापूर/नागपूर-भंडारा
3. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ ठाणे/रायगड/नाशिक/ अहमदनगर/जळगांव/धुळे/औरंगाबाद- जालना/परभणी/ नांदेड/लातर/उस्मानाबाद/ बीड/अमरावती/यवतमाळ/अकोला/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली.
4. धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयातील अधीक्षक-लेखा, अधीक्षक-अंदाज, आस्थापना. मभिसरनोबत/